## नि.दि.मु.नं. १०५/२०१८ मधील निशाणी ७८ वरील आदेश
## (दिनांक ०६/०२/२०२१)

०१. सदरचा अर्ज यातील प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांचे विरुध्द झालेला रोजीचा कैफियत नाही हुकुम रदद् होवून त्यांची कैफियत याकामी सामील करुन घेण्याबाबत दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व म्हणणे वाचले. अर्जात नमूद कारणे अभिलेख पाहता संयुक्तिक वाटतात. सदरील न्यायालय अन्वीक्षा न्यायालय असल्याने पक्षकारांना खालील कोर्टात संधी देणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे पक्षकरांमधील अनावश्यक पुढील प्रकरणे टळतील व दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी तसेच दोन्ही पक्षातील वादाचे अंतिमरित्या निराकरण होणेसाठी मदत होईल. प्रतिवादीचा सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य राहील. मात्र प्रतिवादीने त्यांच्याकडून कैफियत नाहीचा आदेश रदद्बातल अर्ज दाखल करण्यास विलंब केल्यामुळे त्यांच्यावर खर्च बसवणे आवश्यक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

### -::- **आ दे श** -::-

१. प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा अर्ज निशाणी ७८ चा अर्ज खर्च रुपये ५००/- एकत्रीतरित्या वादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. त्यांनी खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर त्यांची कैफियत दाखल करुन घेण्यात यावी.

Digitally signed by Swati Hanmantrao Panhale
Date: 2021.02.06 18:20:32 +0530

सावंतवाडी (एस.एच.पन्हाळे )

दिनांकः- ०६/०२/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), सावंतवाडी.